# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

तक्रार क्र. १२०५/२०१८/नांदेड
(द्वितीय अपील क्र.४७१९/२०१७मध्ये)

श्री. संतोष शंकरराव गुंडाळे, : तक्रारदार
मु.पो.बरबडा,ता.नायगांव,जि.नांदेड

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती
कार्यालय,बिलोली,जि.नांदेड

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,नांदेड

### निर्णय
(सुनावणी दि.०६.११.२०२३ )

तक्रारदार यांनी दि.१४.१०.२०१९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

"तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.राज्य माहिती आयोग यांनी दिलेल्या आदेशाचे अनुपालन केले नाही. त्याकरीता संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी या दोघांनी आयोगाच्या आदेशाचे अवमान केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कलम १८ नुसार कारवाई करण्यात यावी. मला न्याय मिळवून द्यावा ही नम्र विनंती."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.४७१९/२०१७मध्ये दि.२५.०४.२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त विवेचनामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.असा आदेश दिला आहे. "

सदर प्रकरणावर यापूर्वी दि.१५.०६.२०२३रोजी सुनावणी झाली, सदरील सुनावणीला सर्व अनुपस्थित असल्यामुळे सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी आज दि.०६.११.२०२३रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

श्रीमती एस.पी.भैरवाड तत्कालीन जन माहिती अधिकारी व श्री.ए.व्हि.कुलकर्णी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बिलोली, जि.नांदेड

यांना दि.०३.०८.२०२३ रोजी सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी व माहिती देण्यात आली अथवा कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली,

त्यानुसार श्रीमती एस.पी.भैरवाड तत्कालीन जन माहिती अधिकारी दि.०५.१०.२०२३ रोजी त्यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी कथन केले की, सदर प्रकरणात मी सौ.एस.पी.भैरवाड मा.आयोगास खुलासा करु इच्छिते की, इ.स.२०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात व यापूर्वी मी जन माहिती अधिकारी किंवा गटशिक्षणाधिकारी नसल्यामुळे मी माहिती पोहच करु शकले नाही. व मी दिव्यांग (अस्थिभंग ९२%) असल्यामुळे दि.१५.०६.२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही. व तसेच त्या दि.३०.०६.२०२३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्या आहेत. त्यांच्या लेखी खुलाश्यामध्ये तथ्यांश दिसून येत आहे.

आज दि.०६.११.२०२३ रोजी सुनावणीस तक्रारदार श्री.संतोष शंकरराव गुंडाळे हे हजर आहेत. त्यांनी सुचित केले की, अदयापपर्यंत मला कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली दिली नाही.

श्री.ए.व्ही.कुलकर्णी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती बिलोली,जि.नांदेड यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी दि.०३.०८.२०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद नांदेड यांच्या मार्फत देण्यात आली परंतु त्यांनी त्यांचा खुलासा आयोगाला सादर केला नाही,व तसेच आज दि.०६.११.२०२३ रोजीच्या सुनावणीसाठी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ते गैरहजर राहिले आहेत. यावरुन त्यांना या प्रकरणात काहीही म्हणायचे नाही असे दिसून येत आहे. त्यामुळे या कृतीवरुन ते स्वत:हुन शिक्षेसाठी पात्र ठरत आहे.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात, आयोगाने आदेशित करुनही माहिती न देणे, आयोगाच्या आदेशाची अवहेलना करणे, अशा बाबी माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायदयाच्या उल्लंघन करणा-या ठरतात. या प्रकरणी श्री.ए.व्हि.कुलकर्णी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती,बिलोली,जि.नांदेड यांनी अशा सर्व कृती करुन अधिनियमातील कलम २०(१)च्या तरतुदीनुसार करावयाच्या कारवाईस स्वत:ला पात्र ठरविलेले आहे. त्यामुळे श्री.ए.व्हि.कुलकर्णी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बिलोली,जि.नांदेड यांना याप्रकरणी रु.२५,०००/- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती अंतिम करण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

प्रस्तुत प्रकरणात वर नमुद केल्याप्रमाणे जबाबदार श्री.ए.व्हि.कुलकर्णी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बिलोली, जि.नांदेड यांचेकडुन शास्तीची रक्कम वसूल करून ती खालील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (क) व १९ (७) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांचेवर निश्चित करण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष** :- **००७०- इतर प्रशासनिक सेवा**
**६०- इतर सेवा**
**८००- इतर जमा रक्कम**
**१८- माहितीचा अधिकार ००७०-००६-१**

वर नमुद केल्याप्रमाणे शास्तीची वसुली मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नांदेड करावी.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त विवेचनानुसार श्री.ए.व्हि.कुलकर्णी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बिलोली, जि.नांदेड यांना या प्रकरणी रु.२५,०००/-इतकी शास्ती करण्यात येत आहे. तसेच सदर शास्तीची रक्कम वसूल करुन उपरोक्त दिलेल्या

लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात भरणा करण्याची जबाबदारी माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील कलम १९ (८) (क) व १९(७) अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. यानुसार तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

तक्रार क्र.१२०५/२०१८/नांदेड/ एबीजे/जावक क्र. 19631 दि. 26/12/2023
प्रत: माहिती तथा कार्यवाही/अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. श्री.ए.व्हि.कुलकर्णी,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बिलोली,जि.नांदेड यांना मार्फत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड